मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १२३ ■ बुधवार, ०६ ऑगस्ट २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# वैधमापन विभागाचा सावळागोंधळ?




## मापाबद्दल बोलायचं नाही आणि वजनाबद्दल सांगायचं नाही

### जिल्ह्यात विभाग सात, अधिकारी मात्र तीनच ■ ग्राहकांमध्ये वैद्यमापन विभागासंदर्भात तीव्र नाराजी

**सांगली : विशेष प्रतिनिधी**

**वैधमापन विभागाच्या सावळा गोंधळामुळे सांगली जिल्ह्यातील ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. याकडे प्रशासनाचे त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांचेही दुर्लक्ष असल्यामुळे मापाबद्दल बोलायचं नाही आणि 'वजनाबद्दल सांगायचं नाही' अशी स्थिती जिल्ह्यात वैधमापनच्या अधिकारी नसलेल्या चार विभागांमध्ये निर्माण झाली असल्याची चर्चा जोरदारपणे सुरू आहे.**

ग्राहकांची वजनमापात फसवणूक होऊ नये या दृष्टिकोनातूनच वैधमापन विभाग अस्तित्वात आला. सांगली जिल्ह्यात मिरज, जत, सांगली, सांगली-१, सांगली-२ विटा, तासगाव , इस्लामपूर या विभागांमध्ये अधिकारी कार्यरत असावेत अशी सर्वसाधारण योजना आहे. वजन काटे, पेट्रोल पंप, शॉर्ट डिलिव्हरी आदी कामे या वैधमापन केंद्रामार्फत केली जातात. जिल्ह्याचा आवाका बघून सांगली जिल्ह्यात सात विभागात हा वैधमापन विभाग कार्यरत करण्याचा दृष्टिकोन सुरुवातीला होता. परंतु जत,तासगाव, इस्लामपूर या ठिकाणी अधिकारी आहेत तर मिरज , सांगली , सांगली -१, सांगली -२, विटा या ठिकाणी अधिकारीच नसल्यामुळे अतिरिक्त कामाचा ताण जे अधिकारी कार्यरत आहेत त्यांच्यावर पडत आहे. त्यामुळे कामाची गुणवत्ता दिसून येत नसल्यामुळे बाजारामध्ये संपूर्ण अनागोंदी माजली आहे. प्रत्येक वर्षाला वजन काटे शिक्के मारून घेण्याचा नियम असला, तरी वर्षानुवर्ष हे काम होतच नाही, अशी वस्तुस्थिती आहे. त्यातच भाजीपाला विक्रेते, दुकानदार रेटून नेतात आणि त्याचा फटका मात्र सर्वसामान्य जनतेला बसणे, ही नित्याची गोष्ट होऊन बसल्यामुळे ग्राहकांमध्ये वैद्यमापन विभागासंदर्भात तीव्र नाराजी पसरलेली आहे. सात अधिकाऱ्यांची गरज असताना तीन अधिकाऱ्यांवर काम रेटून नेणे, उर्वरित चौघांचे काम या तिघांनी करणे या प्रशासनाच्या भूमिकेमुळे कोणतेच काम सरळ होत नसल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाने आणि राज्य सरकारने या संदर्भात ज्या गांभीर्याने घ्यायला हवे होते ते घेतलेले नाही, अशी चर्चाही जाणकारांमधून केली जात आहे, अधिकारी निवृत्त होऊन अनेक वर्षे लोटली तरी त्यांच्या जागांवर भरती होत नसल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. सहा वर्षांपूर्वी जिल्ह्यातील रिक्त ४ अधिकाऱ्यांच्या जागांवर भरती केली जाईल, अशी घोषणा प्रशासनातर्फे करण्यात आली होती. परंतु ती घोषणा अद्याप मार्गस्थ लागलेली नाही. पाच- सहा वर्षाचा कालावधी उर्वरित तीन अधिकाऱ्यांवरच रेटले गेल्यामुळे, ज्या ठिकाणी या ठिकाणचा अतिरिक्त कारभार ज्या अधिकाऱ्यांच्या डोक्यावर आहे तेथील काम पूर्णतः थांबलेले आहे.

यासंदर्भात विचार करता ' लहरी राजा प्रजा आंधळी, अधांतरी दरबार ' अशी अवस्था राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासनाचीदेखील झालेली आहे. वैधमापन विभागामार्फत तपासणी करण्याचा जो चार्ज आहे, त्यातून जिल्ह्यात लाखो रुपयांचा महसूल राज्य सरकारकडे जमा होतो, अधिकारी नाहीत, आहेत त्यांच्या डोक्यावर अतिरिक्त कार्यभार आणि योग्य तपासणी नाही त्यामुळे जो चार्ज वजन मापे मोजण्यासाठी आकारला जातो,

तो जमा होत नाही एक प्रकारे शासनाचा हा अंदर बट्ट्याचा धंदा आहे असेही बोलले जात आहे. जिल्हा प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन वैधमापन विभागातील अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा तातडीने भरल्यास राज्य शासनाचा महसूलही वाढेल आणि ग्राहकांची फसवणूकही थांबेल, अशी चर्चा जोरदारपणे सांगली जिल्ह्यात सुरू आहे.

## संक्षिप्त...

### बिल डाऊनलोडसाठी 'लॉगिन' अनिवार्य

**मुंबई : हॅलो प्रभात**

सायबर सुरक्षितता तसेच वीज ग्राहक माहितीच्या गोपनीयतेसाठी महावितरणच्या लघुदाब वर्गवारीच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन डाऊनलोड करण्यासाठी आता संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या सायबर सुरक्षेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार हा बदल करण्यात आला आहे.

### वारणा धरणात २८.७० टी.एम.सी.पाणीसाठा

**सांगली : हॅलो प्रभात**

जिल्ह्यातील वारणा धरणात आज सकाळी ८ वाजेपर्यंत २८.७० टी.एम.सी. पाणीसाठा असून या धरणाची साठवण क्षमता ३४.४० टी.एम.सी. इतकी असल्याचे जलसंपदा विभागाने कळिवले आहे.

### घाटनांद्रेत मंचरी पारायणाची सांगता

**कवठेमहांकाळ: हॅलो प्रभात**

सालाबादप्रमाणे याही वर्षी घाटनांद्रे येथे विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या जिर्णोध्दार,कलशारोहण व नव्याने केलेल्या मुर्ती प्रतिष्ठापनाच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या संत तुकाराम महाराजांच्या हस्तलिखित अभंगांचे अर्थात मंचरी गाथेच्या पारायणाची सांगता मोठ्या उत्साहात करण्यात आली.

### वसंतदादा बँकेची नोंदणी रद्द

**सांगली : हॅलो प्रभात**

वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेची सहकार कायद्यानुसार बँक म्हणून असलेली नोंदणी अखेर रद्द झाली आहे. सहकार आयुक्त पुणे यांनी बँकेच्या अंतिम दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी स्मृती पाटील यांची कस्टोडियन म्हणून नेमणूक केली आहे. त्यानंतर बँकेचे अस्तित्व कायमस्वरूपी संपणार आहे.

## 'महादेवी' हत्तीणीला परत आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांचा पुढाकार

### निगा राखण्यासाठी डॉक्टरांसह पथक तयार करणार



**मुंबई : हॅलो प्रभात**

नांदणी मठातील (ता. शिरोळ) माधुरी हत्तीण पुन्हा नांदणीत यावी, अशी जन भावना आहे. ही जनभावना लक्षात घेऊन नांदणी मठाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी. राज्य शासनही स्वतंत्र पुनर्विचार याचिका दाखल करून सर्वोच्च न्यायालयात हत्तीणीला परत देण्यासंदर्भात भूमिका मांडेल, असे सांगून याप्रकरणी राज्य शासन पूर्णपणे मठाच्या पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नांदणी मठ (ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर) येथील माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीच्या प्रश्नासंदर्भात मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वन मंत्री गणेश नाईक, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह नांदणी मठाचे प्रतिनिधी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

नांदणी मठाच्या परंपरा आणि स्थानिक जनतेच्या भावनांचा विचार करून कायदेशीर प्रक्रिया मार्गाने माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीला पुन्हा मठात परत आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या ३४ वर्षांपासून माधुरी हत्तीण नांदणी मठात आहे. माधुरी पुन्हा मठात यावी ही जन भावना आहे. ही जन भावना लक्षात घेऊन राज्य शासन पुनर्विचार याचिका दाखल करेल. मठानेही आपल्या याचिकेमध्ये राज्य शासनाचाही समावेश करावा. तसेच वन विभागाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात स्वतंत्र सविस्तर भूमिका मांडण्यात येईल.

यामध्ये केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाच्या निकषाप्रमाणे व उच्चस्तरीय समितीने सुचविलेल्या सर्व मुद्द्यांचे निराकरण करण्यात येईल. हत्तीणीची निगा राखण्यासाठी डॉक्टरसह राज्य शासन एक पथक तयार करून आवश्यक ती सर्व मदत करेल. आवश्यक वाटल्यास रेस्क्यू सेंटरसारखी व्यवस्थाही करण्यात येईल व त्या प्रमाणे सुविधा देण्यात येतील आदी बाबींचा समावेश करून या बाबी तपासण्यासाठी सर्वोच्च न्यायालयास स्वतंत्र समिती नेमण्याची विनंतीही राज्य शासनामार्फत या याचिकेमध्ये करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. तसेच या प्रकरणात नागरिकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी खा. धैर्यशील माने, खा. विशाल पाटील, आ.राजेंद्र पाटील-यड्रावकर, आ. विश्वजीत कदम, सतेज पाटील, अशोक माने, सदाभाऊ खोत, राहुल आवाडे, अमल महाडिक, राजू शेट्टी, प्रकाश आवाडे, नांदणी मठाचे पूज्य स्वस्तीश्री जिनसेन आदीसह जैन स्वामी व स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## नांदणी प्रकरणी गुन्हे मागे घ्या

### खा.विशाल पाटील ; मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन



**सांगली : हॅलो प्रभात**

नांदणी येथील मठातून महादेवी हत्तीणीला वनतारा केंद्रात नेत असताना जैन समाजातील तरुणांच्या भावनांचा बांध फुटला. त्यातून त्यांच्याकडून काही गोष्टी झाल्या, मात्र परिस्थिती लक्षात घेता त्यांच्यावरील गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी खासदार विशाल पाटील यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

मुंबईत मंत्रालयात झालेल्या बैठकीत खासदार पाटील यांनी सहभाग घेत आपले मुद्दे प्रभावीपणे मांडले. विशेषतः नागरिकांवर दाखल गुन्हे मागे घेण्याची आग्रही मागणी केली. त्यांनी निवेदनात म्हटले आहे, की नांदणी मठाला सुमारे १२०० वर्षांची परंपरा आहे. १९९२ मध्ये महादेवी हत्तीणीला नांदणी मठात आणले, तेंव्हा तिचे वय सहा वर्षे होते. इतके वर्षे या हत्तीणीचा व्यवस्थित सांभाळ केला गेला. तेथे हत्ती सांभाळण्यासाठी विविध सुविधा आहेत. त्याची पूर्ण काळजी घेतली जाते. हत्तीणीचा आणि त्या भागातील नागरिकांचा, जैन श्रावक-श्राविकांचा स्नेहबंध आहे. त्यांचे भावनिक नाते तयार झाले आहे.

अशावेळी हत्तीणीला येथून नेले जात असल्याचे पाहून या भागातील नागरिकांत उद्रेक झाला. त्याबद्दल गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सुमारे १६० जणांवर गुन्हे दाखल आहेत. त्यांच्यावरील गुन्हे मागे घ्यावेत.

शिवाय, वनतारा केंद्रात दाखल करण्यात आलेल्या महादेवी हत्तीणीला परत नांदणी मठात आणण्यासाठी राज्य शासनाने संपूर्ण सहकार करावे. जैन समाजासह सर्वच समाज बांधवाच्या भावनांचा आदर करावा. या प्रकरणी सरकारने सहानुभुतीने विचार करणे गरजेचे आहे, अशी अपेक्षादेखील खासदार पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## आरआयटीच्या स्टार्टअपला २.५२ कोटी रुपयांचा निधी

### पर्यावरण रक्षणासाठीचा पहिला अशा प्रकारचा पथदर्शी प्रकल्प



**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी या एम्पॉवर्ड ऑटोनॉमस इन्स्टिट्यूट मधील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी मिळून २०१८ मध्ये सुरु केलेल्या टीजिपी बायोप्लास्टिकस या स्टार्टअपला महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन यांध्या कॉलॅबोरेटीव्ह प्रोजेक्ट्स बिटवीन इन्स्टिट्यूट्स अँड इंडस्ट्री फॉर टेक्नॉलॉजिकल एंडॉप्शन या स्कीम अंतर्गत घर आणि औद्योगिकदृष्ट्या कंपोस्टेबल प्लास्टिकच्या उत्पादनासाठी औद्योगिक सुसूत्रीकरण या प्रकल्पांतर्गत २.५२ कोटी रुपयांचा निधी मिळाल्याचे आरआयटीचे डायरेक्टर डॉ.पी.व्ही. कडोले यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले, या प्रकल्पासाठी येणारा एकूण खर्च ६.५३ कोटी असून या स्टार्टअपसाठी आरआयटी महाविद्यालयाकडून या प्रकल्पाच्या संशोधन आणि विकासाठी लागणाऱ्या सर्व संशोधन सुविधा पुरविल्या असून या प्रकल्पाच्या उभारणीसाठी लागणाऱ्या सर्व इन्फ्रास्ट्रक्चर फैसिलिटी व जवळपास विस्तारित प्रकल्पासहीत एकूण आठ हजार स्क्वेअर फुटचे इंडस्ट्रियल शेड आणि लागणारे इलेक्ट्रिक कनेक्शन अशी जवळपास १.१० कोटीची गुंतवणूक केली आहे. केंद शासनाकडून कडून इतर प्रकल्पासाठी मिळालेल्या निधीच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या डीएमए, डीएससी एक्सआरडी, एमएफआय, टीजीए, टेनसाईल टेस्टर अशा जवळपास २ कोटीच्या अत्याधुनिक मशीनमुळे कंपोस्टेबल प्लास्टिकची गुणवत्ता व दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे. या सर्व साधनसामग्रीच्या उपलब्धतेसाठी आर आय टी है भविष्यात आरतातील बायोडिग्रीकबल कंपोस्ट प्लास्टिकचे क्षेत्रातील आदर्श संशोधन केंद्र म्हणून विकसित होईल. सध्या अशी सोय फक्त आयआयटी गुवाहाटी व सिपेट चेन्नई येथे उपलब्ध आहे. यातील उर्वरित ४ कोटीची गुंतवणूक टीजिपी बायोप्लास्टिकस यांच्या मार्फत केली जाणार आहे त्यांनी सांगितले कि टीजिपी बायोप्लास्टिकस है स्टार्टअप आरआयटीचे विद्यार्थी आणि प्रा महेश पिसाळ यांच्या पाच वर्षांच्या संशोधन कार्याचे फलित असून २०१८ पासून सुरु असलेल्या संशोधनातूनच कंपोस्टेबल प्लॅस्टिकची निर्मिती झाल्याचे आणि यापूर्वीही महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजि कमिशन यांचेकडून हा प्रकल्प सुरु करण्यासाठी ५३.६२ लाखाचा निधी मिळाला होता. हे स्टार्टअप नामवंत कंपन्यांना कंपोस्टेबल प्लास्टिक आणि त्यासम उत्पादनांचा पुरवठा करत आहे.

यावेळी आरआयटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष भगतसिंह पाटील, आरसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य जयंत पाटील, कासेगाव एज्युकेशन सोसायटी चे सचिव आर.डी.सावंत आणि आरआयटीचे डायरेक्टर पी.व्ही. कडोले यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.




## संपादकीय

### रक्षाबंधन निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

रक्षाबंधन हा सण बहिण-भावाचा सण म्हणून राज्यासह देशात ओळखला जातो.राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे.भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात.यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्वाचे असते. पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखी पौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात.हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण आहे.यामुळे बहिण-भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते. उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्ये'नारळी पौर्णिमा'या नावाने हा सण साजरा केला जातो.पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पुर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतात सुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला.तेव्हापासुन श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले.म्हणूनच रक्षाबंधनाची परंपरा देवी काळापासून तर आजपर्यंत आजतागायत सुरू आहे. यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो. अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात. चित्तोडगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहा पासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती.राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते.यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी 'जान जाये पर वचन न जाये'अशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण -भावाच्या अतुट बंधन.म्हणजेच बहिण-भावाच्या नात्याचा सुवर्ण महोत्सव.कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावुन येण्याचे वचन देतो.यामुळे बहिण -भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते.सध्या बहिण -भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष राहिली तर जमीन (पृथ्वी) राहील,पृथ्वी शाबूत राहिली,तर मानव व संपूर्ण जीवजंतू आणि सृष्टी सुरक्षित राहील.कारण दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पृथ्वी डगमगायला लागली आहे यामुळे भूस्खलन, भूकंप, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस अशाप्रकारच्या कधीच न घडलेल्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत याकरीता पृथ्वीला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर असल्यामुळे जास्तीत जास्त वृक्षारोपण अती आवश्यक आहे.बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी. परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे.कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होतांना दिसत आहे.यामुळे अनेक पशुपक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे व काही पशुपक्षी व वृक्ष लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.पुर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा. परंतु बदलत्या हवामानामुळे मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे व सुनामीचे प्रमाण सुध्दा वाढले आहे. यामुळे मानवी हानी,शेतीचे नुकसान, वित्तीय हानी,समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी,भुकंप, वादळ,विजकोसळने,अती उष्णता,अती थंडी ह्या संपूर्ण भयावह घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो. याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे.त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात.परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक -एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल,भुकंपावर आळा बसेल, अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल. वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक,सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम अशा कोणत्याही मार्गाने होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बदल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळेल. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्तीत जास्त भर देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणाचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.सरकारने राज्यात लाडकी बहिण योजना अंमलात आणली याचे मनापासून स्वागतच अशा प्रकारच्या योजना अंमलात आणल्यानंतर प्रत्येकाला सरकारने एक-एक वृक्ष भेट देऊन पर्यावरण वाचविण्याच्या बंधनात सहभागी केले पाहिजे.सोबतच संपूर्ण प्रशासकीय विभाग,शाळा-महाविद्यालये यांना या पवित्र दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवडीसाठी सरकारने प्रोत्साहीत करून निसर्गाला वाचविले पाहिजे.

### अनंतराव पवार अभियांत्रिकीच्या वतीने वृक्षारोपण




पुणे : हॅलो प्रभात

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने निसर्ग संवर्धन दिनानिमित्त येवलेवाडी टेकडी येथे वृक्षारोपण कार्याक्रामचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्वच्छ पुणे चे प्रचारक विक्रांत सिंग, सामाजिक कार्यकर्ते गोरक्ष दिवेकर व राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.आकाश दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षरोपण ही काळाची गरज आहे. सदर सोहळ्यामध्ये वड, पिंपळ, कडुलिंब,बदाम यासारख्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल ठाकरे, प्रा.आकाश दोडके, प्रा.संदीप राऊत, डॉ.नवनाथ सरोदे, प्रा.नंदिनी कोळे, प्रा.भाग्यश्री तुपेरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.आकाश दोडके यांनी केले.

# आठवणी हिरोशिमा-नागासाकीच्या...

हॅलो प्रभात

**जपानमधील हिरोशिमा या शहरावर ६ ऑगस्ट १९४५ रोजी अणुबॉम्ब टाकण्यात आल्यानंतर जगभरात त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटली. 'अणुबॉम्ब'च्या या विध्वंसक परिणामामुळे केवळ नागरिकच नाही तर शास्त्रज्ञही चिंताग्रस्त झाले. या बॉम्बचे जनक डॉ. ओपेनहाइमर यांनी तर पश्चातापामुळे राजीनामा दिला. या दुर्दैवी घटनेला आता ७९ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने या घटनेची ही आठवण...**

कोळसा, लाकडाचे इंधन आणि विद्युत शक्ती ही उत्पन्न केली जाते. पण हे स्त्रोत संपले की, पुढे काय? हा प्रश्न जगाला भेडसावत होता. शास्त्रज्ञांसमोर शक्तीचे नवे पर्याय शोधण्याची बिकट समस्या होती. विसाव्या शतकाच्या आरंभी जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी आपल्या प्रयोगातून असा सिद्धांत मांडला की, पदार्थाला शक्तीमध्ये व शक्तीला पदार्थात द्रव्यशक्ती समीकरणाद्वारे परावर्तीत करणे शक्य आहे. एक औंस इंधनाने पंधरा लाख टन कोळशाची शक्ती मिळविली जाऊ शकते, ती होती आण्विक शक्ती. आण्विक शक्तीचा शोध घेण्याचा सर्वप्रथम प्रयत्न जर्मनीने अपार परिश्रम घेऊन केला, पण त्यांच्या संशोधनात ते असफल ठरले. जर्मनीच्या अभ्यासातून एक महत्त्वाची माहिती उपलब्ध झाली. ही माहिती नंतर बॉम्ब बनविण्यास अनिवार्य सिद्ध झाली. आपल्या भोवतालची प्रत्येक वस्तू ही अणूंची बनलेली असते. एक अणू हा खूप छोटा असतो. एका मानवी केसाच्या एक दशलक्षपट इतका तो सूक्ष्म असतो. अणू प्रोटॉन्स, न्युट्रॉन्स व इलेक्ट्रॉन्स यांनी बनलेला असतो. प्रोटॉन्सकडे धन विद्युतभार, इलेक्ट्रान्सकडे ऋण विद्युतभार, तर न्युट्रॉन्स हे न्युट्रल असतात. प्रोटॉन्स व न्युट्रॉन्स मिळून न्युक्लिअस (केंद्रक) तयार होतो. १९३८ साली संशोधकांनी असा शोध लावला की युरेनियम अणूच्या केंद्रकावर त्याच्या न्युट्रॉनचा भडिमार केल्यास केंद्रकाचे दोन भाग होऊन अपार शक्ती मुक्त होते. या प्रक्रियेस न्युक्लिअर फिशन असे म्हटले गेले. दुसऱ्या महायुद्धापूर्वी काही महिने अगोदर १९३९ मध्ये हा शोध लागला. विज्ञानशास्त्र आईनस्टाईन यांच्याकडून प्रेरणा घेऊन अमेरिकेचे त्यावेळचे प्रेसिडेंट फ्रेंकलिन रुझवेल्ट यांनी या दिशेने काम करण्याचा निर्णय घेतला. १९४० साली विख्यात भौतिक शास्त्रज्ञ डॉ. रॉबर्ट ओपेनहाइमर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. त्यात नोल्स वोर व एनरिको फर्मी हे अन्य दोन शास्त्रज्ञ होते.

जर्मनी, युरोप आणि अमेरिकेतील प्रमुख वैज्ञानिकांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग या कार्यात होता. अथक परिश्रम व सामुदायिक प्रयत्न यांच्यामुळे १३ जुलै १९४५ रोजी एलामोगेडरो वाळवंटात बॉम्बच्या स्फोटाची चाचणी घेण्यात आली. त्यात मोठ्या ज्वालेसहित गगनभेदी स्फोट होऊन एक मैल त्रिज्येतील जीवजंतू मृत्युमुखी पडले, तर ९ मैलापर्यंत ज्वालांची उष्णता पसरली. याच्या यशाने दोन बॉम्बच्या निर्मितीच्या निश्चय करण्यात आला.

६ ऑगस्ट १९४५ हा मानवाच्या इतिहासातील अतिशय दुर्दैवी दिवस. अमेरिका व मित्र राष्ट्रांनी जपानमधील एका संपन्न शहर हिरोशिमावर पहिला अणुबॉम्ब टाकून साऱ्या जगाला स्तब्ध केले. या बॉम्बचा प्रभाव एवढा जबरदस्त होता की, तीन लाख वस्तीचे हे शहर नष्ट झाले. एका बॉम्बने मनाची शांती झाली नाही म्हणून ९ ऑगस्टला दुसरा बॉम्ब नागासाकी शहरावर टाकण्यात आला. विज्ञानानेच मानवाच्या आत्मविश्वासावर केलेला तो मोठा हल्ला होता. मानवाच्या क्रुरतेपुढे मानवाच्या साहस व शौर्याला पराजय पत्करावा लागला. जपानने या बॉम्ब हल्ल्यानंतर सपशेल शरणागती पत्करली. हिरोशिमावर टाकलेला बॉम्ब हा युरेनियम गन टाईप ॲटोमिक बॉम्ब होता. त्याचा स्फोट हिरोशिमा शहराच्या २००० फूट उंचावर झाला. त्यात शहराचा पाच चौ. मैल एवढा भाग नष्ट पावला. या दोन्ही शहरांत मरण पावलेल्या लोकांतील निम्मे लोक हे बॉम्ब टाकलेल्या दिवशीच मरण पावले. त्यानंतरच्या महिन्यात अनेकजण भाजलेल्या जखमांमुळे, उत्सर्जित किरणाच्या आजारामुळे, अन्य जखमा, अपुरा आहार व आजार यामुळे मृत्यू पावले.

दोन्ही शहरांत मुख्यत्वे मुलकी लोक होते. हिरोशिमात अधिक संख्येने मिलिटरीचे लोक लष्करांच्या शिबंदीमध्ये राहात होते. २ सप्टेंबर १९४५ रोजी जपानने शरणागती पत्करल्यावर दुसरे महायुद्ध संपले. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेचा जपानविरुद्धचा लष्करी एक डावपेच हा शत्रूचा युद्ध उद्योग बॉम्बच्या मदतीने नष्ट करणे हा होता. त्याचप्रमाणे युद्ध उद्योगात कार्यरत असलेल्या मुलकी नोकरांनाही ठार अथवा अकार्यक्षम बनविणे हाही त्यांचा उद्देश होता.

हिरोशिमा, नागासाकी या शहरांवरील हल्ल्यानंतरही जगात दोन हजारांहून अधिक आण्विक शस्त्रांच्या चाचण्या झाल्या. १९४५ ते १९८० या काळात जगातील ५०० हून अधिक ठिकाणी वातावरणातील आण्विक शस्त्रांच्या चाचण्या घेण्यात आल्या. त्यात अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स, चीन, भारत, पाकिस्तान व उत्तर कोरिया या देशांचा समावेश आहे. या देशांनी आण्विक शस्त्रांच्या चाचण्या घेतल्या व त्याची कबुलीही दिली. इस्रायल या देशाकडे आण्विक शस्त्रास्त्र असूनही त्या देशाने तस्संबंधीची कबुली दिली नाही. या चाचण्यांतूनच लिनस पॉलिंग यांना आण्विक शक्तीविरोधात लढण्याची प्रेरणा मिळाली. वातावरणातील आण्विक चाचण्या बंद करण्यासाठी व ॲटमबॉम्बची निर्मिती बंद करण्यासाठी त्यांनी मोहीम उघडली. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना सन १९६२ मध्ये नोबेल शांततेचे पारितोषिक प्राप्त झाले. जपानमध्येही शांततेच्या मोहिमा उघडण्यात आल्या. तिथे १९५४ मध्ये ॲटम व हैड्रोजन बॉम्बच्या विरोधात जपानीज काऊंसिल अगेस्ट ॲटोमिक ॲण्ड हैड्रोजन बॉम्बस् स्थापण्यात आली. पॅसिफिक समुद्रात आण्विक शस्त्रांच्या चाचण्या घेण्यात जपानने विरोध केला आणि आण्विक शस्त्रांवर बंधन आणण्यासाठी ३५ दशलक्ष सह्यांचे निवेदन दिले. खुद्द अमेरिकेतही बोस्टन येथे ॲटोमिक एनर्जी कमिशनच्या रेडियो ॲक्टिव्हचा टाकावू गाळसाठा १९ किलोमीटर्सपर्यंत फेकून देण्यास मज्जाव करण्यात आला. सन १९६३ पर्यंत अनेक देशांनी वातावरणातील आण्विक चाचण्यांच्या बंदीसाठी मंजुरी दिली. हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर बॉम्ब टाकल्यानंतर सर्व जगभरात त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. अणुबॉम्बच्या या विध्वंसक परिणामामुळे केवळ नागरिकच नाही तर शास्त्रज्ञही चिंताग्रस्त झाले.



### कसा असतो अणुबॉम्ब...

**६ ऑगस्ट-हिरोशिमा/९ ऑगस्ट-नागासाकीदिन**

गेल्या काही शतकांपूर्वी अणूबॉम्बचा शोध लागला. अणू प्रत्यक्षात खूप लहान असला तरी, त्यात प्रचंड ऊर्जा सामाविलेली असते. त्यामुळे त्याच्या केंद्रस्थानावर न्यूट्रॉनचा हल्ला केल्यावर अणुचं केंद्रस्थान अस्थिर होतं आणि ही ऊर्जा बाहेर पडते आणि स्फोट होतो. अणुचं विघटन (fission) आणि एकीकरण (fusion) केल्यावर ही ऊर्जा बाहेर पडत असल्याने अणूबॉम्ब निर्मितीचे हे दोन प्रकार होतात. यासाठी युरेनियम, प्लुटोनियम यांसारखे अणु वापरले जातात. अणूबॉम्बचा प्रायोगिक स्फोट अमेरिकेने १६ जुलै १९४५ रोजी न्यू मेक्सिको राज्यातील ॲलामोगोर्डो येथे केला होता. त्यानंतर अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी ६ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या हिरोशिमा शहरावर अणूबॉम्ब टाकला. युरेनियमचा वापर केलेल्या या बॉम्बचे नाव 'लिटील बॉय' होते तर नागासाकी येथे ९ ऑगस्ट १९४५ रोजी टाकलेल्या बॉम्बमध्ये प्लुटोनियम वापरण्यात आले होते व त्याचे नाव 'फॅट मॅन' होते. या दोन्ही हल्ल्यात एक लाखाहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर त्याहून अधिक नागरिक जखमी झाले होते. अण्वस्त्र हाताळताना किरणोत्सर्गाची भीती असते, त्यामुळे साध्या बॉम्बप्रमाणे अणूबॉम्ब थेट हाताळता येत नाही किंवा चित्रपटात दाखविता तसा साध्या बॉम्बसारखा फेकता येत नाही. त्यासाठी विशेष उपकरणांची निर्मिती करावी लागते.



हिरोशिमा-नागासाकीवर टाकण्यासाठीचा बॉम्ब तयार करण्यासाठी अमेरिकेने केलेल्या एकूण खर्चापैकी ५८ टक्के उपकरणांवर झाला होता. हे बॉम्ब ग्रॅव्हिटी बॉम्बच्या साहाय्याने विमानातून या शहरांवर टाकण्यात आले होते. आता त्यासाठी अण्वस्त्रवाहू क्षेपणास्त्राचा वापर केला जातो. सध्या अमेरिका, रशिया, चीन, जपान, भारत, पाकिस्तान यांसह इतरही काही देशांकडे अण्वस्त्र आहेत. मात्र अण्वस्त्रांपासून होणारे धोके लक्ष घेता, अनेक देशांनी बचावासाठी पर्यायी व्यवस्थाही केली आहे. रशियाने अणू हल्ल्याच्यावेळी आश्रय घेता यावा, यासाठी जमिनीत खोल भुयारे बांधली आहेत. तर अमेरिकेने दूर अंतरावरून होणाऱ्या आगामी हल्ल्याची पूर्वसूचना देणारी रडारयंत्रणा कोट्यवधी डॉलर्स खर्च करून उभारली आहे. असं असलं, तरी अण्वस्त्रांपासून सध्या तरी पूर्ण बचाव करता येण्याइतकी साधनं उपलब्ध झालेली नाहीत

#### डॉ. ओपेनहाईमर यांचा राजीनामा

बॉम्बचे जनक डॉ. ओपेनहाईमर यांना तर अतिशय पश्चाताप झाला. विश्वबंधुत्वाच्या भावनेतून त्यांनी आपला राजीनामा देऊन मानवतेचा संदेश जगास दिला. जनमताचा विरोध असूनही काही राष्ट्रे अमेरिकेच्या विरोधात जाऊन त्यांनी अणुबॉम्बची निर्मिती चालू ठेवली. रशिया हे या संदर्भातील पहिले राष्ट्र होते. रशियाने १९४९ साली अणुबॉम्बची सफल चाचणी घेऊन अमेरिकेची मक्तेदारी संपुष्टात आणली.

आण्विक शस्त्रास्त्र कमी करण्यासाठी मॉस्कोत एक करार करण्यात आला, त्यानुसार अणुबॉम्बच्या भूमिगत चाचण्यास संमती देण्यात येऊन हवा व पाणी या माध्यमातील चाचण्यांस विरोध करण्यात आला. प्रत्येक राष्ट्राने किमान मॉस्को कराराचे पालन करून एकमेकांतील सद्भावनेची ज्योत तेवत ठेवणे महत्त्वाचे आहे.

***• भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी अनेकवेळा हे स्पष्ट केले होते की, भारत सदैव अणुशक्तीचा वापर मानव कल्याणासाठीच करेल. भारत व कॅनडा यांनी आण्विक शक्तीचा प्रयोग विध्वंसक शक्तीच्या स्वरूपात न करता शांतिपूर्वक कामासाठी करण्याचा निर्णय घेतला. भारताने १८ मे १९७४ रोजी अणुस्फोटाची यशस्वी चाचणी केली असली तरी भारत हा एकमेव असा अपवाद आहे, जो अणुशक्तीच्या संहारक भूमिकेला सुरुवातीपासूनच विरोध करीत आहे.***

### कर्मचारी-अधिकाऱ्यांनी रक्तदान करून स्व.बापूंना केले अभिवादन




इस्लामपूर : हॅलो प्रभात

राजारामबापू साखर कारखान्याच्या साखराळे, वाटेगाव-सुरूल, कारंदवाडी व तिप्पेहळ्ळी-जत युनिटचे कर्मचारी-अधिकारी,तसेच आरआयटीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या स्मरणार्थ रक्तदान करून त्यांना अभिवादन केले. ४५६ रक्त दात्यांनी रक्तदान केले. गेल्या ४0 वर्षापासून ही परंपरा जपली जात आहे. कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वी करण्यात आला. साखराळे येथे आरआयटीचे संचालक डॉ. पी.व्ही.कडोले यांच्या हस्ते स्व.बापूंच्या प्रतिमे चे पूजन करून रक्तदान शिबिराची सुरुवात करण्यात आली. येथे २२३ कर्मचारी, अधिकारी व आरआयटीच्या विद्यार्थी- विद्या र्थिनींनी रक्तदान केले. राजारामबापू ब्लड बँक व कोल्हापूर येथील अर्पण ब्लड बँकेने रक्त संकलन केले.वाटेगाव-सुरूल येथे ८२, कारंदवाडी येथे ६२ ,तर तिप्पेहळ्ळी येथे ८९ कर्मचारी व अधिकाऱ्यांनी रक्तदान केले. सिद्धी विनायक , अर्पण व जत ब्लड बँकेने रक्त संकलन केले. कारखान्याचे उपाध्यक्ष विजयराव पाटील,कार्यकारी संचालक आर.डी.माहुली,सचिव डी.एम. पाटील,वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रकाश म्हाळुंगकर व अधिकाऱ्यांनी संयोजन केले.

## डी. वाय. पाटील अभियांत्रिकीला स्कॉलर विद्यार्थ्यांची पसंती

कोल्हापूर : हॅलो प्रभात

राज्य तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी जाहीर करण्यात आलेल्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीत (CAP-1) फेरीत डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, क. बावडा, कोल्हापूर महाविद्यालयाने स्कॉलर विद्यार्थ्यांची विशेष पसंती मिळवत प्रवेश प्रक्रियेत आघाडी घेतली आहे.



कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या शाखेसाठी ९७.0३% गुण मिळवणारी सृष्टी अनिल पाटील हिने प्रवेश घेतला आहे, तर ९६.४२% गुण मिळवणारी सई किरण माने हिने इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागात प्रवेश घेतला आहे. महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रम यांमुळे डी. वाय. पाटील महाविद्यालय हे प्रवेशासाठी प्रथम पसंतीचे ठरले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील व विश्वस्त ऋतुराज पाटील यांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता म्हणाले, १९८४ साली स्थापन झालेल्या या महाविद्यालयाला एन. बी. ए. आणि नॅक कडून प्रतिष्ठित मानांकन प्राप्त झाले आहे. ही आमच्या शैक्षणिक उत्कृष्टतेची साक्ष आहे. यावर्षी आमच्या विद्यार्थ्यांची नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. काही विद्यार्थ्यांना २७ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे. यावेळी रजिस्ट्रार डॉ. एल. व्ही. मालदे, प्रवेशप्रक्रिया प्रमुख प्रा. आर. जी. बेन्नी, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिओ-ब्लॅकरॉककडून पाच इंडेक्स फंड्स सादर

मुंबई : हॅलो प्रभात

Jio BlackRock

जिओ ब्लॅकरॉक ॲसेट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडने न्यू फंड ऑफरिंग अंतर्गत पाच इंडेक्स फंड्स लॉंच केले आहेत. हे फंड्स आहेत १. जिओब्लॅकरॉक निफ्टी ५0 इंडेक्स फंड, २. जिओब्लॅकरॉक निफ्टी नेक्स्ट ५0 इंडेक्स फंड, ३.जिओब्लॅकरॉक निफ्टी मिडकॅप १५0 इंडेक्स फंड, ४. जओब्लॅकरॉक निफ्टी स्मॉलकॅप २५0 इंडेक्स फंड, ५.जिओब्लॅकरॉक निफ्टी ८-१३ इयर इंडेक्स फंड ही न्यू फंड ऑफरिंग ५ ऑगस्ट २0२५ पासून सुरू होऊन १२ ऑगस्ट २0२५ पर्यंत सुरू राहणार आहे. जिओ फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड आणि ब्लॅकरॉक इंक या दोन कंपन्यांच्या संयुक्त भागीदारीत ही ॲसेट मॅनेजमेंट कंपनी स्थापन करण्यात आली आहे.

### ओबेन इलेक्ट्रिकची नेक्स्ट-जेन रॉर ईझी सिग्मा लॉंच

पुणे : हॅलो प्रभात



ओबेन इलेक्ट्रिक भारतातील स्वदेशी संशोधन आणि विकास-चालित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनीने, आज रॉर ईझी सिग्म - या पुढच्या पिढीची इलेक्ट्रिक प्रवासाची मोटरसायकल मर्यादित कालावधीसाठी १.२७ लाख पासून सुरू होणाऱ्या विशेष प्रारंभिक किंमतीत लॉंच करण्याची घोषणा केली आहे. आधुनिक भारतीय रायडरसाठी शहरी प्रवासाची पुनर्परिभाषा करण्यासाठी डिझाइन केलेली, रॉर ईझी सिग्मा ही मजबूत कम्युटर-फर्स्ट रचनेवर आधारित आहे ज्यामुळे रॉर ईझी यशस्वी झाली आहे, अनुभव आणि उपयुक्तता दोन्ही वाढवण्यासाठी प्रमुख हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर अपग्रेड सादर करण्यात आले आहे.

### एनएसईने २३ कोटी गुंतवणूकदार खात्यांचा टप्पा केला पार

मुंबई : हॅलो प्रभात

NSE

जुलै २0२५ मध्ये नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (एनएसई) ने आणखी एक मैलाचा टप्पा साध्य केला असून, एकूण ट्रेडिंग खाती २३ कोटींवर (२३0 दशलक्ष) पोहोचली आहेत. एप्रिल २0२५ मध्ये २२ कोटींचा (२२0 दशलक्ष) टप्पा पार केल्यानंतर केवळ तीन महिन्यांत हे यश प्राप्त झाले आहे. दरम्यान, नोंदणीकृत गुंतवणूकदारांची संख्या ११.८ कोटींवर पोहोचली आहे. एका गुंतवणूकदाराची अनेक दलालांकडेखाती असू शकतात, त्यामुळे त्यांचे एकाहून अधिक क्लायंट कोड्स असू शकतात. एकत्रितपणे, हे पाच राज्य जवळपास निम्म्या गुंतवणूकदार खाती दर्शवतात, तर पहिल्या दहा राज्यांचा वाटा जवळपास तीन-चतुर्थांश इतका आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात,** कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



# संमिश्र

## नांदणीच्या 'माधुरी' हत्तीसाठी नृसिंहवाडीत मूक मोर्चा



**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

येथे जैन बांधवांच्या वतीने नांदणीची माधुरी हत्ती परत मिळण्यासाठी सर्व पक्षीय मूक मोर्चा काढण्यात आला. विठ्ठल मंदिर येथून दुपारी तीन वाजता मूक मोर्चाला प्रारंभ झाला. त्यानंतर मिठाई पेठ, ग्रामपंचायत कार्यालय, संभाजीनगर,आणुजे गल्ली, ओतवाडी परिसर, मार्गांनी चौक, मराठी शाळा, परत विठ्ठल मंदिर या ठिकाणी मूक मोर्चा चा समारोप करण्यात आला. यावेळी वीर सेवादल ,वीर महिला मंडळ, दिगंबर जैन कमिटी ग्रामपंचायत , दत्त देवस्थान विविध संस्थेचे पदाधिकारी,पतसंस्थेचे व सेवा सोसायटीचे प्रतिनिधी, श्रावक श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी जितेंद्र आणुजे यांनी स्वागत व प्रास्ताविक करून सर्वांचे आभार मानले.

## अनिष सोनटक्केची टेबल टेनिस स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी ; सुवर्णपदकाची कमाई




**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

सांगली येथे २८ जुलै रोजी पार पडलेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय रँकिंग टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथील बी.कॉम तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी कु. अनिष सतीश सोनटक्के याने चमकदार कामगिरी करत ओपन सिंगल कॅटेगरीत सुवर्णपदक पटकावले. विशेष म्हणजे, राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवणारा तो कोल्हापूर जिल्ह्यातील पहिला खेळाडू ठरला आहे, ही अत्यंत गौरवाची बाब आहे. या यशामुळे अनिष सोनटक्के याने कोल्हापूर जिल्ह्याचे नाव संपूर्ण राज्यात उज्वल केले आहे.या यशासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, तसेच सी.ई.ओ. श्री. कौस्तुभ गावडे यांचे अमूल्य प्रोत्साहन आणि पाठबळ मिळाले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ.विकास जाधव, प्रा.संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, तसेच रजिस्ट्रार श्री. एस. के. धनवडे व श्री. सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन आणि पाठबळही अनिषला लाभले. महाविद्यालय, संस्था आणि सर्व शिक्षकवर्गाकडून अनिषच्या या ऐतिहासिक यशाबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.

## लक्ष्मी मुक्ती योजनेचा लाभ घ्यावा : डॉ.अर्चना पाटील

**गारगोटी : हॅलो प्रभात**



सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून १ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियान राबविण्यात येत आहे. याअनुषंगाने लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतजमिनीवर त्यांच्या पत्नीचे नाव सहधारक म्हणून नोंद करण्यासाठी लक्ष्मी मुक्ती योजनेत जास्तीत जास्त महिलांनी सहभागी होवून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन भुदरगडच्या तहसिलदार डॉ. अर्चना पाटील यांनी केले आहे. स्त्रियांचे हक्कांच्या सुरक्षिततेच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत ७/१२ उताऱ्यात पुरुषांबरोबर स्त्रियांच्या मालकी हक्काची नोंद होण्याबाबत शासन परिपत्रकात निर्देश देण्यात आले आहेत. भुदरगड तहसील कार्यालयाच्या अधिनस्त लक्ष्मी मुक्ती योजनेअंतर्गत शेतक-यांच्या शेतजमिनीवर त्यांच्या पत्नीचे नाव सह हिस्सेदार म्हणून नोंद करण्याबाबत मोहीम सुरु असून या योजनेत सर्व नागरिक, ग्रामस्थांनी सहभागी व्हावे व ग्राम महसूल अधिकारी कार्यालयात आपले अर्ज दाखल करावेत, असेही पत्रकाद्वारे केले आहे.

## श्री सयाजीनाथ विद्यालयात ड्रोन विषयी कार्यशाळा

**पुणे : हॅलो प्रभात**

गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या वडमुखवाडी येथील श्री. सयाजीनाथ महाराज विद्यालयात रोटरी क्लब ऑफ पुणे नॉर्थ यांच्यामार्फत ड्रोन विषयी कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी रोटरी क्लब ऑफ पुणे नॉर्थ चे अध्यक्ष मा.श्री .मोहन पुजारी , प्रकल्प सहाय्यक अधिकारी श्री .सारंग बालंखे तसेच सौ.दीप्ती पुजारी (प्रकल्प नियंत्रक) यांनी विद्यार्थ्यांना ड्रोन ची निर्मिती ,ड्रोन म्हणजे काय?, ड्रोनचा शेती व्यवसाय, बचाव कार्य धील मधील वाढता वापर याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य राजकुमार गायकवाड उपस्थित होते. यावेळी विद्यालयात ड्रोन चे प्रात्यक्षिक घेण्यात आले. हे पाहण्यासाठी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार रामभाऊ मोझे संस्थेच्या संचालिका प्रा.श्रीम.अलकाताई पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुजरे यांच्या संकल्पनेतून या कार्यशाळेचे आयोजन विद्यालयात करण्यात आले होते. शालेय विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी हा यामागील उद्देश आहे असे अध्यक्षांनी यावेळी सांगितले

# प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी शिवाजी रोडे-पाटील

## उपाध्यक्षपदी सुरेश कोळी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या सभेचे आयोजन दि. ४ ऑगस्ट रोजी बँकेच्या मुख्य सभागृहात करण्यात आले. या सभेत अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाच्या निवडी पार पडल्या. सहाय्यक निबंधक प्रेरणा शिवदास (अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर) यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया शांततेत पार पडली. अध्यक्षपदासाठी शिवाजी रोडे-पाटील (ता.शाहुवाडी) यांचे नाव वर्षा केनवडे यांनी सुचवले, तर अर्जुन पाटील यांनी त्यास अनुमोदन दिले. उपाध्यक्षपदासाठी सुरेश कोळी (ता.करवीर) यांचे नाव पद्मजा मेढे यांनी सुचवले व बाळकृष्ण हळदकर यांनी अनुमोदन दिले. अध्यक्ष



व उपाध्यक्ष पदासाठी इतर कोणतीही नामनिर्देशन पत्रिका नसल्यामुळे दोन्ही उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याचे अधिसूचित करण्यात आले. नूतन अध्यक्ष शिवाजी रोडे-पाटील यांनी संचालक मंडळ, सुकाणू समिती, व सर्व सभासदांचे आभार मानले. बँकेचा कारभार पारदर्शक ठेवून, सभासदांच्या अडचणी सोडवण्याचा आणि बँकेचा व्यवसाय व ठेवींमध्ये वाढ घडवून आणण्याचा आमचा प्रयत्न राहील,असे आश्वासन त्यांनी आपल्या भाषणात दिले.

या निवड प्रक्रियेनंतर प्रेरणा शिवदास यांनी सभेचा शांततेत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात झालेला कार्यभाग संपन्न झाल्याबद्दल समाधान व्यक्त करून निवड कार्यक्रम संपल्याची घोषणा केली.यावेळी बँकेचे संचालक, सुकाणू समितीचे पदाधिकारी, शिक्षक पतसंस्था प्रतिनिधी, विविध संघटनांचे पदाधिकारी, तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयकुमार मगदूम उपस्थित होते.कार्यक्रमाच्या समारोपानंतर नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला आणि उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले.

# नृसिंहवाडीच्या उपसरपंच पदी विद्या कांबळे

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

येथील ग्रामपंचायत उपसरपंच पदी सौ विद्या बजरंग कांबळे यांची निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी सरपंच चेतन चंद्रकांत गवळी हे होते. उपसरपंच रमेश मोरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा रोटेशन प्रमाणे व ठरलेल्या वेळेत दिल्यानंतर रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी ग्रामपंचायत सभागृहात सोमवारी दुपारी दोन वाजता विशेष बैठक बोलण्यात आली होती. यावेळी सर्वानुमते



सौ.विद्या कांबळे यांची उपसरपंच पदी निवड झाल्याची घोषणा सरपंच चेतन गवळी यांनी केली. या निवडीनंतर नूतन उपसरपंच सौ विद्या कांबळे यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दत्तगुरु आघाडीचे कार्यकर्ते तसेच प्रबुद्ध नगर मधील समाज बांधवांनी या निवडीनंतर फटाक्यांचे आतषबाजी व गुलालाची उधळण करत आनंदोत्सव साजरा केला.यावेळी विद्या कांबळे म्हणाल्या, बौद्ध समाजाला मोठे प्रतिनिधित्व दिल्याबद्दल सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच गावकरी यांच्यामुळेच हे शक्य झाल्याचे सांगत दिलेल्या संधीचा गावातील चांगल्या कामासाठी निश्चित उपयोग करीन अशी ग्वाही दिली. या निवडी वेळी ग्रामपंचायत सदस्य तानाजी निकम, ग्रामसेवक हेमंत कोळी तसेच सामाजिक कार्यकर्ते बजरंग कांबळे, रघुनाथ शिंदे,मोहन काळे, रमेश सुतार, अनिल माणगावे, श्रीनिवास कांबळे, गणेश सुतार, प्रीतम साळुंखे, पिंटू मोरे आदी प्रमुख नेत्यासह कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते

## उत्कृष्ट तहसीलदार म्हणून परीक्षित पाटील यांचा गौरव



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

महसूल दिनाच्या निमित्ताने रत्नागिरी जिल्ह्यातील नियोजन भवन सभागृहात पार पडलेल्या प्रमुख सत्कार समारंभात सन २०२४-२५ या महसूली वर्षात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. या सोहळ्यात उत्कृष्ट तहसीलदार म्हणून परीक्षित पांडुरंग पाटील यांना मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महसूल प्रशासनातील त्यांच्या कार्याची दखल घेत जिल्हा प्रशासनाने त्यांचा सन्मान केला. या समारंभाला प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनील गोसावी, जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे, अपर जिल्हाधिकारी भाऊसो गलांडे, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.महसूल दिन दरवर्षी १ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. १ ऑगस्ट ते ३१ जुलै हे महसूली वर्ष समजले जाते. या दिवशी मागील वर्षभरात प्रशासनात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान केला जातो. परिक्षीत पाटील यांचे अभिनंदन करताना ग्रामस्थ व सहकारी यांच्यात आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या यशस्वी कारकीर्दीस भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# काँग्रेस कमिटीच्या जनरल सेक्रेटरी पदी शशांक बावचकर

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव पदावर २०२१ पासून कार्यरत असलेल्या शशांक बावचकर यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या जनरल सेक्रेटरी पदावर निवड करण्यात आली आहे. ही निवड अखिल भारतीय काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या मान्यतेने करण्यात आली असून, जनरल सेक्रेटरी के. सी. वेणुगोपाल यांनी अधिकृत निवडीची घोषणा केली. बावचकर यांच्या कार्यतत्परतेचा



आणि संघटन कौशल्याचा विचार करून त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे काँग्रेस पक्षाच्या राज्यातील संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास पक्षातील वरिष्ठांनी व्यक्त केला आहे. बावचकर यांच्या निवडीबद्दल काँग्रेस कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला असून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.श्री.बावचकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हा काँग्रेस सहप्रभारी व प्रभारी म्हणून काम संभाळले आहे. सध्या ते सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हा काँग्रेस निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. कर्नाटक विधानसभा निवडणुक प्रचारासाठी त्यांची निवड करण्यात आली होती. १९८१ पासून विद्यार्थी संघटनेतुन कामास सुरवात केलेल्या श्री.बावचकर यांनी १० वर्षे अभ्यासू नगरसेवक म्हणून काम केले आहे, विधानपरिषदे मधील गटनेते माजी मंत्री सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली श्री.बावचकर कार्यरत असून त्यांच्या निवडीने काँग्रेस कार्यकर्त्यांत उत्साह निर्माण झाला आहे.

## 'महादेवी'साठी विश्व हिंदू परिषदच्या वतीने काढलेला मोर्चा यशस्वी



**हुपरी : हॅलो प्रभात**

विश्व हिंदू परिषद बजरंगदल हुपरीच्या वतीने माधुरी / महादेवी परत आणायचीच व प्रशासनाला याबाबतीत भाग पाडायचं या मागणीसाठी भव्य मोर्चा काढण्यात आला. हुपरी येथील छत्रपती श्री शिवाजी नगर येथे छत्रपतींच्या मूर्तीस हार घालून मोर्चाला सुरुवात झाली सदर मूक मोर्चाची सांगता गांवातील स्टँडवर सुभाषचंद्र बोस यांच्या मूर्तीजवळ झाली. या मोर्चामध्ये जात-पात पंथ - संप्रदाय असा कोणताही भेदभाव न करता सर्वांचाच समावेश होता.

भाजपाचे सुभाषदादा गोटखिंडे यांनी महादेवी या हत्तीणीला परत आणण्यासंदर्भात प्रशासनाच्या स्तरावर प्रयत्न सुरू आहेत व लवकरच महादेवी परत येईल असे सांगितले. यानंतर विश्व हिंदू परिषद जिल्हा सहमंत्री निळकंठ माने यांनी न्यायालयीन प्रणाली यात हा विषय न अडकवता प्रशासनाने व शासनाने ह्या हत्तींनीस नांदणीच्या मठामध्ये परत द्यावी असे सांगितले. या मोर्चामध्ये विश्व हिंदू परिषद शहरमंत्री प्रशांत साळोखे, बजरंगदल संयोजक सुरज पाटील, प्रकाश रणदिवे, मनोज पाटील, प्रतापराव भोसले, शिवदास माने, श्रावण मुधाळे, गौरव नेमिष्टे, बंडुफिरगाण राजेंद्र साळोखे सुधीर गाट विरकुमार शेंडुरे हेमंत एकांडे रोहित देसाई, तुषार वाईंगडे असे सर्व बजरंगी व समस्त हिंदू समाज उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील महिलांनी अद्यावत कौशल्यातून कुटुंबांची प्रगती साधावी : राजेंद्र चव्हाण

**राधानगरी : हॅलो प्रभात**

संगणक, ए आय, फॅशन डिझायन, हर्बल प्रॉडक्ट इत्यादी कोर्सचे अद्यावत कौशल्य कोर्स व सरावा द्वारे प्राप्त करून ग्रामीण भागातील युवती व महिलांनी स्वतः सोबत कुटुंबाची प्रगती करत शाश्वत विकासाचे ध्येय गाठावे असे प्रतिपादन इनसाईट कॉम्प्युटर इन्स्टिटयूट राधानगरी चे प्रमुख राजेंद्र चव्हाण यांनी केले.मांगेवाडी (ता.राधानगरी) येथील स्वजन ज्ञान केंद्र,रीड इंडीया नवी दिल्ली संस्थेच्या 'स्किल टू सक्सीड' कार्यक्रम अंतर्गत संगणक व फॅशन डिझाईन कोर्सच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक समिती प्रमुख अरुणा मगदूम होत्या.

'रीड इंडिया ' ही संस्था भारतामधील ग्रामीण भागात 'समुदाय ग्रंथालय व संसाधन केंद्र ' द्वारे शाश्वत ग्राम विकासाचे काम गेली १८ वर्षे




करत आहे. भारतातील ६० वे केंद्र नुकतेच राधानगरी तालुक्यातील मांगेवाडी येथे सुरू झाले आहे.

या केंद्राचा उद्देश राधानगरी परिसरातील दुर्गम भागातील ग्रामस्थांचा विशेषत: महिला व युवक यांचा सर्वांगीण विकास करणे हा आहे असे सामाजिक कार्यकर्ते सुहास चौगले यांनी सांगितले. 'स्किल टू सक्सीड' कार्यक्रमांतर्गत कोणकोणत्या कोर्सेसना यावर्षी प्राधान्य राहील याबाबत माहिती रीड इंडिया चे महाराष्ट्र सल्लागार विजय रानमाळे यांनी दिली. कोर्सच्या नियमावली, प्रमाणपत्र व भविष्यातील नियोजन याविषयी मार्गदर्शन प्रशिक्षक सौ.छाया पाटील यांनी केले.

शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय तिटवे चे उपप्राचार्य सागर शेटगे यांनी देखील उपस्थितांना संगणकीय शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपसरपंच सातापा मगदूम,उद्योजक सागर मगदूम, सतिश कांबळे उपस्थित होते.

सूत्रसंचालन रीड केंद्र समन्वयक मेघाराणी रानमाळे यांनी केले. आभार प्रदर्शन संगणक प्रशिक्षक सुहास पाटील मांगोलीकर यांनी केले.

# 'शरद'च्या १५ विद्यार्थ्यांची राणे मद्रास कंपनीत निवड

**यड्राव : हॅलो प्रभात**

यड्राव येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची राणे मद्रास या नामांकित कंपनीत निवड झाली. महाविद्यालयातील मेकॅट्रॉनिक्स, इलेक्टॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग व इलेक्ट्रीकल विभागातील विद्यार्थ्यांना संधी मिळाली.मेकॅट्रॉनिक्स विभागातील प्रियंका देवकाते, अंजली एकसंबे, तनुजा वडगे, सायली खडके, प्रगती पाटील, विशाखा पाटील, नम्रता पाटील, अशिका शेट्टी, प्रणाली चौगुले, इलेक्टॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमधील श्वेता सांगले, तपस्या जाधव, मोक्ष तकडे, प्राजक्ता जाधव,




इलेक्ट्रीकलमधील कोमल पाटील, अक्षता हिरेमठ यांची निवड झाली.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग अंतर्गत सुरू असलेल्या ॲक्टीव्हिटी स्लॉटमध्ये मुलांच्याकडून ग्रुप डिसक्शन, इंटरव्ह्यु टेक्नीक्सचा सराव करून घेण्यात आला आहे.

व्हॅप अंतर्गत व प्रोजेक्ट बेसड लर्निंग याचा फायदा विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी झाला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आमदार डॉ.राजेंद्र पाटील यड्रावकर, एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी अभिनंदन केले. ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेलचे प्रा. नेहा प्रसून यांच्यासह सर्व डिन, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# ‘लक्ष्मीनारायण’ लाभांशापोटी २७ लाख ०७ हजारांचे वाटप करणार

**१५ टक्के लांभाशाची घोषणा**

**मुरगूड : संदीप सूर्यवंशी**

येथील सुवर्णमहोत्सवी श्री लक्ष्मी नारायण नागरी सहकारी पत संस्थेच्या सन २०२४/२५ या अर्थिक वर्षातील २ कोटी ७२ लाख ०१ हजारांच्या विक्रमी निव्वळ नफ्यातून सर्व सभासदांना १५ टक्के लाभांश देण्यात येणार असून त्याद्वारे २९ लाख ०९ हजारांचे वाटप केले जाणार असल्याची घोषणा संस्था सभापती किशोर पोतदार यांनी केली ते ५९ व्या वार्षिक सभेत बोलत होते.

यावेळी सभापती म्हणाले, संस्थेने गेल्या अहवाल सालात ५९५ कोटी ९२ लाखांचा विक्रमी व्यवसाय केला असून त्यात १२२ कोटी ४३ लाखांच्या ठेवीच्या आधारे ९० कोटी ०२ लाखांचे कर्ज वाटप केले आहे त्यापैकी ५३ कोटी ४० लाखांचे कर्ज हे सोनेतारणा वरील आहे व दि ३१ मार्च २०२५ नंतर ४ महीन्यातील संस्थेच्या प्रगतीचीही माहिती दिली तसेच चालू वर्षी संस्थेच्या ३१ लाख रुपयाचा संस्था महोत्सव निधी अंतर्गत सभासदांना दिपावली भेट वस्तू देण्याचा संकल्प आहे तसेच त्यांनी ३१ मार्च २०२६ अखेर



१५० कोटी ठेवी, १०५ कोटी कर्जे व ३ कोटी नफा करणेचे उदिष्टे ठेवलेले आहे.

संस्थापक संचालक जवाहर शहा यांनी संस्था स्थापनेपासुनची माहिती सभासदांना दिली. तसेच संस्थेचे ऑडीटर एस जे देशपांडे यांनी संस्थेची प्रगतीची माहीती व सन २०२४/२५ सालासाठी अ वर्ग दिलेचे जाहिर केले. संस्थेचे सभासद व शेळेवाडी गावचे सरपंच प्रविण पाटील यांनी संस्थेची शाखा -शेळेवाडी प्रगती व संस्था कामकाजाबद्दल सभाधान व्यक्त केले व आय डी कुंभार सर यांनी संस्थेच्या कामाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळीश्री लक्ष्मी नारायण प्रतिमेचे पुजन संस्थेचे सभासद आनंदा पोवार, डॉ. दगडू नारे, साताप्पा पाटील, एकनाथ बरकाळे व दिपप्रज्वलन सभासद नामदेव शिंदे, शंकर बरगे, मंगेश पाटील यांचे हस्ते करणेत आले व सभासदांच्या मुलांना फेब्रुवारी व मार्च २०२५ मध्ये १० वी १२ वी मध्ये गुणवत्ता धारक पाल्यांचे संस्थेचे सभापती, उपसभापती व सर्व संचालक यांचे हस्ते (रोख रक्कम, प्रशस्तीपत्र, गौरवचिन्ह) देवून सन्मान करणेत आला. तसेच १० वी १२ वी मध्ये प्रथम क्रमांकासाठी संस्थेचे मयत सभासद कै. शंकर गणपती शिरगांवकर यांचे स्मरणार्थ श्री. दत्तात्रय शिरगांवकर यांचेकडून प्रत्येकी रोख रु.५००/- बक्षीस ही देण्यात आले. तसेच संस्थेची पिग्मी एंजट सौ. वैशाली वसंत पाटील यांची कन्या कुशर्वरी हीची महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीकडे विद्युत सहाय्यक पदी निवड झालेने तिचा गौरवचिन्ह देवून सस्थेमार्फत सत्कार करणेत आला. संस्थेचे जनरल मॅनेजर श्री नवनाथ डवरी यांनी अहवाल वाचन केले. सभेत उपसभापती दतात्रय कांबळे संचालक दतात्रय तांबट, अनंत फर्नांडीस, रविंद्र खराडे, विनय पोतदार, चंद्रकांत माळवदे, रविंद्र सणगर, तज्ञ संचालक जगदीश देशपांडे, सौ. सुनिता शिंदे, सौ. सुजाता सुतार, व श्रीमती भारती कामत यांच्यासह सेवक वर्ग उपस्थित होते.

# ‘एमआयटी एडीटी’ विद्यापीठाचा ‘विद्यारंभ-२५’

**पुणे : हॅलो प्रभात**

येथील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणेमध्ये नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांच्या १०व्या बॅचचा स्वागत समारंभ अर्थात ‘विद्यारंभ-२५’ची सुरुवात बुधवार (ता.६ ऑगस्ट) पासून तीन दिवसीय भव्य कार्यक्रमाने होणार आहे. या कार्यक्रमासाठी खास उभारण्यात आलेल्या ‘स्वामी विवेकानंद सभा मंडपात’ हजारो विद्यार्थी आणि पालकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडेल.

माईर्स एमआयटी शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ.विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमासाठी भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव प्रा.अभय करंदीकर व आयआयटी जोधपूर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी, अखिल भारतीय दहशतवादविरोधी



मोर्चाचे (एआयएटीएफ) चेअरमन मनिंदर जीत सिंग बिट्टा यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यासह, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ.मंगेश कराड, कुलगुरू प्रा. डॉ.राजेश एस., कार्यकारी संचालक प्रा. डॉ.सुनीता कराड, कार्यकारी संचालक प्रा.ज्योती ढाकणे, कार्यकारी संचालक प्रा.विनायक घैसास, प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

या तीन दिवसीय कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विद्यापीठाबद्दल तसेच, विद्यापीठाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच, याप्रसंगी विद्यार्थ्यांना आयोजित सांस्कृतीक कार्यक्रमात त्यांच्या अंगी असणारे कलागुण सादर करण्याचीही संधी प्राप्त होणार आहे. एमआयटी एडीटी विद्यापीठात दरवर्षी प्रमाणे यंदाही मोठ्याप्रमाणात नवीन विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी तीन दिवस विविध भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये अनेक उद्योग तज्ञांच्या मार्गदर्शन सत्रांचा समावेश असेल, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.राजेश एस., व कुलसचिव डॉ.चोपडे यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

**११ ऑगस्ट-एमआयटी एडीटी विद्यापीठाचा स्थापना दिन**

एमआयटी एडीटी विद्यापीठाचा १० वा स्थापना दिन सोमवारी (११ ऑगस्ट) रोजी भव्य कार्यक्रमाद्वारे हजारो विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कमचारी यांच्या उपस्थितीत साजरा केला जाणार आहे. याप्रसंगी, जेष्ठ अभिनेते महाराष्ट्र भूषण, पद्मश्री अशोक सराफ व भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) वैज्ञानिक पद्मश्री डॉ. नागराजन वेदाचलम आणि मालवीय राष्ट्रीय इन्स्टिट्यूट ऑफ टॅक्नॉलॉजीचे संचालक (एमएनआयटी) प्रा. डॉ. एन.पी.पाधी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

# अलमट्टी धरणाच्या नियमनासंदर्भात दिल्लीत बैठक संपन्न



**मिरज : हॅलो प्रभात**

नवी दिल्ली येथे महाराष्ट्र राज्य जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील व विभागाचे सेक्रटरी दिपक कपुर यांच्या उपस्थित अलमट्टी धरणाच्या नियमनासंदर्भात चर्चा झाली व या अनुषंगाने नवी दिल्ली येथील केंद्रीय जलशक्ती मंत्री ना. सी.आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्णा विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय जलशक्ती यांच्या दालनात आ.डॉ.सुरेशभाऊ खाडे व अन्य आमदार व खासदार यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली

यावेळी केंद्रीय जलशक्ती विभागाच्या सचिव सौ.मुखर्जी यांनी सांगितले की, अलमट्टी धरणांची उंची वाढविण्यावर सुप्रीम कोर्टाकडुन स्थगिती असल्याने अलमट्टी धरणांची उंच वाढविता येता येणार नाही. तसेच एन.डी.एस एजन्सी यांच्यामार्फत सर्व्हे केला जाईल. त्यानुसार अलमट्टी धरणांचे काम केले असेल तर महाराष्ट्र शासनाकडुन सुप्रीम कोर्टामध्ये क्वीड दाखल करण्यात येईल.

या बैठकीत अलमट्टी धरणाच्या संदर्भात ना. सी.आर.पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा झाली व याबाबत योग्य तो तोडगा काढण्याचे आश्वासन ना. सी.आर.पाटील यांनी दिले असल्याची माहिती मिरजेचे आमदार डॉ.सुरेशभाऊ खाडे यांनी दिली.

# टेंभुर्णीत पोलिसांचा दृढ निर्धार



## भव्य रूट मार्च ने दिला शांततेचा संदेश

**मोडनिंब : हॅलो प्रभात**

टेंभुर्णी येथे १ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११:०० ते १२:०५ या कालावधीत आगामी सण-उत्सव व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भव्य पोलीस रूट मार्च पार पडला. कायदा-सुव्यवस्थेचा संपूर्ण अंमल सुनिश्चित करण्यासाठी व नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करण्याच्या उद्देशाने हा रूट मार्च आयोजित करण्यात आला.

या रूट मार्चमध्ये संभाव्य सामाजिक अस्थिरता, तसेच धार्मिक वा जातीय संघर्ष उद्भवल्यास तत्काळ व प्रभावी कारवाई करता यावी, या दृष्टीने नियोजन करण्यात आले होते. यामध्ये टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे ५ अधिकारी व २५ अंमलदार, पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण कडील RCP पथकातील १७ अंमलदार आणि तेलंगणा येथून आलेल्या रॅपिड क्शन फोर्सच्या (ठऋ) १ कमांडट, २ पोलीस निरीक्षक आणि ३३ जवानांचा समावेश होता. रूट मार्चची सुरुवात टेंभुर्णी पोलीस ठाण्यापासून झाली. त्यानंतर कुर्डूवाडी चौक, सराफ कट्टा, महादेव गल्ली, शुक्रवार पेठ, वेश, महादेव मंदिर, करमाळा चौक, बेंबळे चौक, एस.टी. स्टँड मार्गे पुन्हा पोलीस ठाण्यावर समाप्ती झाली. या रूट मार्चमुळे शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा निर्धार दृढ झाल्याचे चित्र दिसून आले असून नागरिकांत सकारात्मक प्रतिसाद व सुरक्षिततेबाबतचा विश्वास अधिक बळकट झाला आहे.

# तातडीने ‘महादेवी’ला नांदणी मठाकडे सुपूर्द करावे

## राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा आंदोलनाचा इशारा

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

इस्लामपूर शहर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने श्री जीनसेन भट्टारक नांदणी मठातील महादेवी हत्तीण जामनगर (गुजरात) येथील वनतारा येथे नेल्याचा जाहीर निषेध येथील ऐतिहासिक कचेरी चौकात करण्यात आला. जवळपास ७०० वर्षापासून धार्मिक विधीसाठी हत्ती सांभाळण्याची नांदणी मठाची परंपरा आहे. जैन समाजाच्या भावनांचा विचार करून तातडीने महादेवीला नांदणी मठाकडे सुपूर्द करावे. अन्यथा तीव्र आंदोलन करू,



असा इशारा महिला राष्ट्रवादीच्या प्रदेश सदस्या कमल पाटील यांनी दिला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष शहाजी पाटील म्हणाले,पेटा संस्थेने २०२३ मध्ये मठास दिलेल्या भेटीनंतर महादेवीची देखभाल व्यवस्थित होत नसल्याचा चुकीचा अहवाल देऊन न्यायालयाची दिशाभूल केली आहे. त्यातून हा प्रकार घडला आहे.

यावेळी माजी नगराध्यक्षा प्रा.अरुणादेवी पाटील, राज्य सरचिटणीस अरुण कांबळे, महिला शहराध्यक्षा पुष्पलता खरात,माजी शहर अध्यक्षा रोझा किणीकर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकध्यक्ष विजयराव पाटील, माजी नगराध्यक्ष सुभाषराव सुर्यवंशी, नेर्ल्याचे सरपंच संजय पाटील,माजी उप नगराध्यक्ष शंकरराव चव्हाण, सुनिल मलगुंडे, अनिल पावणे, शैलजा जाधव,प्रतिभा पाटील, मालन वाकळे,मनिषा पेठकर, सुनंदा साठे, सागर चव्हाण, शकील जमादार,विशाल सुर्यवंशी, अभिजित शिंदे,बाळासो कोळेकर, अभिमन्यू क्षिरसागर,मोहन भिंगार्डे,सुहास पाटील, सुहास हांडे, जुबेर खाटीक यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री.मल्लिकार्जुन डोंगरावर हिंदू समाजाच्यावतीने महाआरती

**येडेनिपाणी : हॅलो प्रभात**

वाळवा तालुक्यातील सह्याद्रीच्या रांगेत असलेले येडेनिपाणी येथील तीर्थक्षेत्र मल्लिकार्जुन डोंगरावर (किल्ले विलासगड) असलेल्या पुरातन श्रीकृष्ण मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सोमवारी सकल हिंदू समाजाच्यावतीने श्रीकृष्ण महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. प्रार्थना स्थळाच्या शेजारीच असलेल्या मंदिरासमोर ही महाआरती होणार असल्याने मोठा जमाव जमणार असल्याने येथे पोलिसांनी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे ही आरती शांततेत पार पडली. मल्लिकार्जुन डोंगराच्या वरती असलेले श्रीकृष्ण मंदिर या परिसरातील एकमेव पुरातन मंदिर आहे. या मंदिराचा जिर्णोद्धार व्हावा अशी मागणी अनेक हिंदुत्ववादी संघटनांनी वेळोवेळी केली आहे. यावेळी लोक वर्गणीतून जीर्णोद्धार करण्याचा निश्चय हिंदू समाजाने केला आहे. सोमवारी सकाळी विविध हिंदुत्ववादी संघटनांनी येथे महाआरतीचे आयोजन केले होते. आरतीसाठी जिल्ह्यातून चारशे ते पाचशे तरुणांचा जमाव जमला होता. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष सम्राट महाडीक, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर,ह.भ.प अनिल महाराज देवळेकर, पै.नितीन आमुने, दीपक काटे आदी उपस्थित होते.

# महसूल दिनानिमित्त कोकरूड येथे वृक्षारोपण



**शिराळा : हॅलो प्रभात**

महसूल दिनानिमित्त कोकरूड येथे कोकरूड ते नेर्लेफुल पर्यंत वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी अंकुश नांगरे उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तोसिफ मकानदार, भरत नागरे, शिवतेज उद्योग समूहाचे प्रमुख अनिलराव देशमुख, विकास नांगरे श्रीरंग नागरे माजी सरपंच, विकास देशमुख काका, भिमराव घोडे, मोहन पाटील बापू व सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

गेल्या तीन वर्षांपासून प्रति वर्ष १००० झाडे कोकरूड ग्रामपंचायत कडून लावण्यात येतात, यावर्षी ग्रामपंचायतीने स्वतःच्या निधीतून काही झाडे उपलब्ध केली आहेत, तसेच भगवान शामराव पवार यांनी स्व. सर्जेराव पांडुरंग पाटील यांच्या स्मरणार्थ रु ५,०००/, गजानन श्रीपती घोडे यांनी त्यांचे वडील स्व.श्रीपती घोडे गुरुजी यांच्या स्मरणार्थ रु १५,०००/ व भगवान नामदेव घोडे पाटील यांनी त्यांचे वडील नामदेव घोडे पाटील यांच्या स्मरणार्थ रू १०,००० ची झाडे दिली आहेत, ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन, गावात आंबा (केशर/ हापूस ) पेरू, आवळा, नारळ, सीताफळ, चिंच , इत्यादी फळांची, जास्वंदी, पांढरा चाफा, पारिजातक ही फुलांची तसेच कडी पत्ता, कडू लिंब, करंजी, बांबू, शिसव, गुलमोहर, सागवान, वड, पिंपळ, बेल इत्यादी जंगली झाडे लावली आहेत,

शासनाच्या शिराळा व इस्लामपूर येथील वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाकडूनही झाडे उपलब्ध झाली. ग्रामपंचायत झाडे उपलब्ध करून शेतकऱ्यांना वाटप करते व उर्वरित झाडे स्मशानभूमी, एस टी स्टँड परिसर व रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली जात आहेत.

# स्टँप पेपर वरील मिळकत ७/१२ सदरीच्या नोंदीसाठी नव्या निर्णयाची गरज नाही

**चंदनदादा चव्हाण यांची माहिती**

**सांगली : हॅलो प्रभात**

स्टँप पेपरवर मिळकती खरेदी केलेल्या गुंठेवारी धारकांना ७/१२ उताऱ्यावर नावे लावण्यासाठी कोणत्याही नव्या कायद्याची आवश्यकता नाही, कारण यासाठी गुंठेवारी कायद्यातच स्पष्ट तरतुदी आहेत,असे गुंठेवारी चळवळीचे जनक चंदनदादा चव्हाण यांनी केले.

पुढे चव्हाण यांनी स्पष्ट केले की, ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १८८२ चे कलम ५३(अ) नुसार नोंदणीकृत नसलेले दस्तऐवज सुद्धा कायदेशीर पुरावा ग्राह्य मानला आहे. त्यामुळे महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ मधील कलम ४(२)(अ) अन्वये स्टॅम्प पेपरवरील व्यवहार ग्राह्य धरले जातात. गुंठेवारी पद्धतीने मिळकती खरेदी केलेल्या नागरिकांची नावे ७/१२ उताऱ्यावर नोंदवण्यास कोणतीही कायदेशीर अडचण नाही. मिरज तहसीलदार कार्यालयाने ८ फेब्रुवारी २०१९ रोजी जिल्हा सरकारी वकिलांचा अभिप्राय घेऊन तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले असून त्यानुसार कायदेशीर नोंदी सुरू आहेत.२००१ पासून आजपर्यंत हजारो गुंठेवारी धारकांच्या नावावर ७/१२ उतारे मिळाले आहेत, हे नमूद करून चव्हाण यांनी नव्याने महसूल मंत्र्यांनी कोणताही निर्णय घेण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले. त्याचबरोबर, २००१ ते ३१ डिसेंबर



२०२० या कालावधीत स्टॅम्प पेपरवर व्यवहार केलेल्या नागरिकांनी आपली कागदपत्रे मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करून, नोंदणी अधिनियम १९५८ चे कलम ३३ नुसार स्टॅम्प ड्युटी व दंड भरून दस्तऐवज प्रमाणित करून घावेत, असेही चव्हाण यांनी सांगितले. त्यामुळे त्यांना ७/१२ उताऱ्यावर नावे लावण्यात अडचण येणार नाही. गुंठेवारी कायदा वेगळा व महसूल कायदे वेगळे आहेत.

वर्ग २ चे वर्ग १ रूपांतरित करणासाठी ५ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयात पॅरा ६ मध्ये स्पष्ट तरतूद आहे. तहसीलदार कार्यालयात प्रमाणपत्र सादर करून २५ टक्के नजराणा भरल्यास, नागरिकांना वर्ग १ चे आदेश दिले जात आहेत. यासाठी स्वतंत्र कायद्याची गरज नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.गुंठेवारी धारकांना अ कृषक म्हणजेच ‘बिनशेती परवानगी’ मिळण्यासाठी सुमारे १५०० ते २००० फायली आजही प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले. २००३ मध्ये सरकारी मोजणीसाठी ५०० रुपयांचा दर निश्चित करणारा आदेश सरकारने काढला असला, तरी सन्मिकू महापालिकेने २० वर्षे त्याची अंमलबजावणी केली नाही. अखेर २०२२ मध्ये हा आदेश पुन्हा लागू करण्यात आला. तसेच भूमी अभिलेख विभागाकडून सरकारी मोजणी करून नकाशा तयार करून तहसीलदार कचेरीत सादर केल्यास त्यांना अकृषक आदेश मिळतो ही प्रक्रिया आजही सुरु आहे. त्यामुळे आपल्या हक्कासाठी पुढाकार घ्या असे आवाहन गुंठेवारी चळवळीचे जनक चंदनदादा चव्हाण यांनी यांनी केले आहे.



# स्थानिक नेत्यांचे पक्षांतर मतदारांना रुचेल काय ?

**दौंड : हॅलो प्रभात**

मागील काही महिन्यांपूर्वी विधानसभा निवडणूका पार पडल्या. आता अवघ्या काही दिवसात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे पडघम वाजणार आहेत. त्यामुळे मतदारसंघातील विरोधी पक्षातील स्थानिक नेत्यांनी आपल्या कार्यकर्तासहीत सत्तेतील पक्षात प्रवेश केले असुन हे पक्षांतर करणारे नेते व कार्यकर्ते मतदारांना रुचेल का ? अशी चर्चा मतदारसंघात सुरू आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील मोठ्या प्रमाणात राजकीय नेते मंडळी व कार्यकर्ते पक्षांतर करीत आहेत. आपल्या समर्थक जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, नगर परिषद सदस्य, यांच्या वेगवेगळ्या पक्षात जसे की शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना ( उबाठा ) गटातील आपल्या असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला.

काहींनी प्रवेश स्व हितासाठी की, जनतेच्या हितासाठी केला. असा प्रश्न मतदारांना पडला आहे. मतदार आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कंन्व्हर्ट

**आम्हाला जे चांगले दिसेल आम्ही ते करु ; मतदारांची भूमिका**




होणार का ? एकंदरीत स्थिती बघितली तर सरसगट मतदार कंन्व्हर्ट होणार का ? त्यामुळे पक्षांतर केलेल्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना पक्ष संघटना मजबूत ठेवण्यासाठी कसरत करावी लागेल. एवढेच नव्हे तर अनेक निष्ठावंत कार्यकर्ते सुद्धा आपली मुळपक्षांची विचारधारा सोडायला तयार नाहीत. अशा परिस्थितीत कोणत्या पक्षाला तारणार हे आगामी काळातच समोर येईल. पण ज्या मतदारांच्या भरवश्यावर ही राजकीय मंडळी निवडुन येतात. त्या मतदारांना या नेत्यांचे पक्षांतर रुचेल काय ? हा महत्त्वाचा विषय आहे. या घरवापसीमुळे दौंड मध्ये कुणाची ताकद वाढणार की अंतर्गत गटबाजीला ऊत येणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

निष्ठावान कार्यकर्त्यांऐवजी नवख्या लोकांना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे जुन्या कार्यकर्त्यांचा उत्साह कमी झाला आहे. निष्ठावान कार्यकर्ते आपले नाव होईल किंवा नाही याची चिंता न करता अविरतपणे काम करत असतात. म्हणून वरिष्ठांनी सजग राहुन वरील सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे. सध्याची अस्वस्थता आणि अंतर्गत गोंधळ यामुळे पक्षाच्या निवडणूक तयारीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता त्या जवळ येत असताना पक्षाला आपली रणनीती आणि कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवण्याची गरज आहे.

## जिल्ह्याचे नाव 'अहिल्यानगर' पण न्यायालय अहमदनगर




**राहुरी : हॅलो प्रभात**

लोकसंग्रहात चौंडी (ता.जामखेड) येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ३१ मे २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या नामकरणाची घोषणा केली होती, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दर्शविला. राज्य मंत्रिमंडळाने हा निर्णय १३ मार्च २०२४ रोजी अधिकृतपणे मंजूर केला आणि प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला . ४ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने प्रस्तावाला मंजुरी दिली आणि ८ ऑक्टोबर २०२४ ला या निर्णयाची अधिसूचना जाहीर करण्यात आली, ज्याद्वारे शहर, तालुका व जिल्ह्याचा अधिकृत नाव 'अहिल्यानगर' म्हणून लागू करण्यात आले. सद्यस्थितीमध्ये सर्व सरकारी व निमसरकारी तसेच कागदपत्र,दस्तऐवज इमारतीवर अहमदनगर ऐवजी अहिल्यानगर नामांतर झालेले आहे. परंतु अहिल्यानगर शहरामधील जिल्हा सत्र न्यायालय प्रशासकीय इमारतीवर अद्याप अहमदनगर असल्याचे मिरी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा जेष्ठ नेते राजुमामा तागड यांच्या निदर्शनास आले आहे.

## प्रमोद पंडितची अपंगावर मात करून उच्च भरारी

**राहुरी : हॅलो प्रभात**



अभिनेता, दिग्दर्शक प्रमोद भाऊसाहेब पंडित एक छोटेसे खेडे असलेले गाव पाथरे बु. (ता.राहाता) जन्मता अपंग असल्यामुळे संघर्षाला तोंड देऊन आज गगन भरारी घेतली आहे. परिस्थितीवर मात करत अभिनयाची आवड जोपासत प्रगती केली. बारावीपर्यंत शिक्षण, उंची कमी असताना शाळेत शिकत असताना नाटक व डान्स सहभाग घेतला. आवड निर्माण झाली अकरावी बारावी मध्ये असताना एडसवर एक भारुड निर्माण केले ते भारुड दुसऱ्या देशात प्रदर्शित झाल तिथून पुढे बारावी पूर्ण झाली झाल्यावर मला एक राजा नंबर वन मराठी चित्रपट भेटला येथे शूटिंग औरंगाबाद मध्ये झाले मग दुसऱ्या चित्रपट एक रुपयाच्या अगदी गजभार अधिकार सलग दोन चित्रपट केले तिथून पुढे मला काम मिळायला लागले व पुरस्कार पण भेटू लागले,मराठी चित्रपट राजा नंबर वन,कोररर, कंदुरी,बाबो, कहानी आईच्या प्रेमाची, सासूच्या घरात जावयाची वरात, घोटाळ्यात घोटाळा, ताराराणी, द फार्म हाऊस, बायको केली फजिती झाली, रणरागिणी,हिंदी चित्रपट एक रुपया चांदी का देश हमारा गांधी का,वेब सिरीज गावाकडली बोंबाबोंब, घोळात घोळ बट्ट्या घोळ, नको ते कुटाणे,, कार्यकर्ते जोमात सरपंच कोमात, अल्बम साँग करा ना माझे लगीन, पोरगी कडक, अग तारा, पोरगी हळदीने माखली, मला भरली उडी उडी, काटा फुटला,पुरस्कार मिळालेले कल्याणी महिला उद्योग पुरस्कार,सिंधुताई सामाजिक कलावंत पुरस्कार,दादासाहेब फाळके पुरस्कार नाशिक,चित्रपट महामंडळ कलावंत पुरस्कार,रणरागिनी म हिला कल रत्न पुरस्कार,राहुरी विद्यापीठ सन्मानपत्र देऊन,कलवंत विचार मंच पुरस्कार,तसेच सन्मानपत्र ट्रॉफी देऊन भरपूर सन्मान मिळाला,

## संजीवनी प्रतिष्ठानचा 'एक राखी जवानांसाठी' रक्षा रथ रवाना

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

संजीवनी युवा प्रतिष्ठान आयोजित एक राखी जवानांसाठी या उपक्रमासाठी देशातील विविध ठिकाणांहून राखी संकलन करण्यात येणार आहे. यासाठी शिर्डी ते श्रीनगर रथ यात्रेचे आज शिर्डी येथून प्रस्थान झाले.

या प्रसंगी अतिथी म्हणून शिर्डी संस्थानचे सीईओ गोरक्ष गाडीलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने हजर होते.संजीवनी युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष विवेक कोल्हे आणि संजीवनी शिक्षण संस्थेचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.मान्यवरांनी तिरंगा ध्वज दाखवून या राखी यात्रेला प्रारंभ



केला आणि शुभेच्छा दिल्या.

संजीवनी युवा प्रतिष्ठान गेले दहा वर्ष विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. एक राखी जवानांसाठी हा उपक्रम गेली पाच वर्ष मोठ्या उत्साहात राबवला जातो. या वर्षी एक लाखाहून अधिक राख्या शिर्डी ते श्रीनगर राखी यात्रेत जमा होणार असून त्या सैनिक बांधवांना सीमेवर रक्षाबंधनानिमित्त पोहोचविण्यात येत आहे या उपक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन विवेक कोल्हे यांनी केले. पुढे बोलताना ते म्हणाले साईबाबांच्या भूमीमध्ये अनेक क्रांतिकारकांनी आशीर्वाद घेतले आहेत व शिर्डी सारख्या भूमीत अनेक स्वातंत्र्य सैनिक घडले आहेत त्यामुळे देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना साईबाबांच्या नगरीतून सुरुवात झालेली ही रथयात्रा सहा राज्यातून प्रवास करणार असून पंचिवस मोठ्या शहरांमध्ये या यात्रेचे स्वागत होणार असल्याचे कोल्हे म्हणाले.

यावेळी ड. शिवाजीराव कोते, शिवाजीराव गोंदकर, दिलीपराव गोंदकर, महेंद्र शेळके, सखाराम चौधरी, गणेश कारखाना चेअरमन सुधीरराव लहारे, विजयराव दंडवते व संचालक मंडळ, सचिन कोते, रामचंद्र बोठे, उत्तमराव मते, रमेश गागरे, भारतराव तुरकने, सचिन कोते, चंद्रभान धनवटे, राजेंद्र लहारे, डॉ. वसंतराव लभडे, ड. लोंढे, अण्णासाहेब वाघे, भाऊसाहेब थेटे, अविनाश दंडवते तसेच क्षेत्र शिर्डी व पंचक्रोशीतील विविध मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देशाचे भविष्य असलेल्या युवकांनी भडकावू भाषणापासून दूर रहावे

### यवत ग्रामस्थांनी नेत्यांचे कान टोचले

**दौंड : हॅलो प्रभात**

जबाबदार राजकीय नेत्यांनी भडकावू भाषण करुन युवकांच्या मनामध्ये जातीय तेढ निर्माण करु नये, युवक हे देशाचे भविष्य आहे. त्यांना योग्य मार्गदर्शन करुन योग्य दिशा देणे हे प्रत्येक राजकीय पक्षाचे, जबाबदार नेत्यांचे कर्तव्य आहे. प्रत्येक राजकीय पक्ष राजकारण करुन आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करीत असल्याचे चित्र सध्या सर्वत्र बघावयास मिळत आहे. यामध्ये सामान्य युवक वर्ग भरडला जाणार असल्याने युवकांनी राजकारणापासून जबाबदार नेत्यांनी त्यांना दुर ठेवावे तसेच देशाचे भविष्य असलेल्या युवकांनीही भडकावू भाषणाला बळी पडू नये, असे आवाहन यवत गावातील सर्व जेष्ठ नागरिकांनी युवकांना आवाहन केले आहे. ज्या नेत्यांनी भडकावू भाषण करून यवत ग्रामपंचायत हद्दीत विविध धर्माचे नागरिक पूर्वीपासून एकोप्याने राहत आहेत. दौंड तालुका हा सुसंस्कृत तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील प्रत्येक गावात अनेक धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. परंतु काही राजकीय नेते आणि पुढाऱ्याकडू प्रसिध्दीसाठी खोटे नाटे आरोप प्रत्यारोप करत शांत आणि संयमी असलेल्या यवत गावात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे. काही राजकीय नेते जाहीर सभेतून भडकावू भाषण करत असताना अशा नेत्यांवर व गाव पुढाऱ्यांवर कारवाई का होत नाही ? हा संशोधनाचा विषय आहे. कायदा - सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी सरकारची आहे. जर सरकारच्या चुका कुणीतरी मांडत असेल आणि त्याला रोखले जात असेल, तर हे लोकशाहीसाठी घातक आहे. त्यामुळे अशा भडकावू भाषणाकडे दुर्लक्ष करून शांतता ठेवत यवतच्या प्रगतीचे साक्षीदार व्हा, असे आवाहन यवत गावातील जेष्ठ नागरिक व ग्रामस्थांनी केले आहे.

## शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी महिंद्र कांबळे ; उपाध्यक्षपदी सुषमा लव्हटे




**पन्हाळा : हॅलो प्रभात**

कोतोली (ता.पन्हाळा) येथील प्राथमिक शाळेतील शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी महिंद्र कांबळे तर उपाध्यक्षपदी सुषमा संतोष लव्हटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.या निवडीवेळी हनुमान उद्योग समुहाचे संचालक युवा नेते प्रशांत पाटील, राज लव्हटे, कृष्णा पाटील, परशुराम पाटील, गणेश पाटील, रणजित चौगुले,विकास लव्हटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## अनंतराव पवार अभियांत्रिकीत विद्यार्थ्यांना गुणपत्रक वाटप

**पुणे : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयामध्ये बॅचलर ऑफ व्होकेशनल या तीन वर्षाच्या डिग्री कोर्सच्या विद्यार्थ्यांचा गुणपत्रक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयामध्ये उद्योग क्षेत्राची कुशल मनुष्यबळाची आवश्यकता ओळखून सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, इलेक्ट्रॉनिक्स मनुफॅक्चरिंग सर्व्हीसेस, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडीशनींग, ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग, प्लंबिंग आणि इलेक्ट्रिकल हे तीन वर्षाचे डिग्री कोर्स राबविले जातात. या अभ्यासक्रमाच्या पहिल्या



बॅचच्या विद्यार्थ्यांचा गुणपत्रक वितरण समारंभ नुकताच पार पडला. या कार्यक्रमाचा सुरवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांनी यशाला शॉर्टकट नसतो, जिद्द मेहनत अभ्यासात सातत्य असेल तर यश निश्चित मिळतेच. सध्या तंत्रज्ञानाच्या काळात बॅचलर ऑफ व्होकेशनल (इ.तेल) कोर्सेसची खूप गरज आहे. हे कोर्सेस विद्यार्थ्यांना विशिष्ट उद्योगांसाठी आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान देतात, ज्यामुळे त्यांना नोकरीच्या चांगल्या संधी मिळतात. या अभ्यासक्रमामुळे कौशल्य-आधारित शिक्षण, नोकरीच्या संधी आणि व्यावहारिक ज्ञान प्राप्त करतो. यामध्ये शिक्षण आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव यांचा मेळ घातलेला असल्यामुळे या विद्यार्थी नोकरी किंवा स्वतःचा व्यवसाय करू शकतो. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या आहारी न जाता तंत्रज्ञानाचा वापर समाजाच्या शास्वत विकासासाठी करावा असे प्रतिपादन या प्रसंगी केले. अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक प्रा.गणेश कोंढाळकर यांनी विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतः व्यवसाय करून उद्योजक व्हावे असे प्रतिपादन केले.

यावेळी प्राचार्य डॉ.सुनील ठाकरे,प्रा.गणेश कोंढाळकर, बॅचलर ऑफ व्होकेशनल कोर्से चे समन्वयक प्रा.राजश्री निकम, प्रा.संदीप राऊत, प्रा. विकास म्हेत्रे, प्रा.निकिता भागात, प्रा.राकेश यादव, प्रा. अमोल आटपाडकर, सर्व विभाग प्रमुख, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सायली कोकणे यांनी केले तर प्रा.गणेश कोंढाळकर यांनी आभार मानले.

## बालनाट्य स्पर्धेत आत्मा मालिकची कामगिरी



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

हायजिन फर्स्ट या संस्थेच्या वतीने आयोजित 'अन्नसुरक्षा जनजागृती' या आंतरशालेय बालनाट्य स्पर्धा २०२५-२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला. या बालनाट्य स्पर्धेत आत्मा मालिकने नेत्रदिपक कामगिरी केली असून तीन पुरस्काराचे मानकरी ठरले आहे.स्वच्छ परिसर, स्वच्छ किचन व वैयक्तिक स्वच्छता या गटांमध्ये आत्मा मलिक शैक्षणिक व क्रीडा संकुलाने 'प्रथम' क्रमांक पटकाविला, तसेच बालनाट्य स्पर्धा ही लहान व मोठ्या अशा दोन गटात पार पडली होती. आत्मा मालिक इंग्लिश मीडियम गुरुकुलाच्या स्वच्छमं राज्यमं या मोठ्या गटातील बालनाट्यासाठी प्रथम क्रमांक तर आत्मा मालिक माध्यमिक व उच्च माध्यमिक गुरुकुलाच्या अन्नपूर्णा खानावळ या लहान गटातील बालनाट्यासाठी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.यावेळी बोलताना विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट कोकमठाणचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी म्हटले की, आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलामध्ये सांस्कृतिक विभागातर्गत कला, नृत्य, अभिनय, संगीत या विद्यार्थ्यांमधील कलागुणांना अनुभवी व तज्ञ मार्गदर्शकाकडुन विकसित करण्याचे काम केले जाते. म्हणूनच वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी हे यश प्राप्त केले आहे. हे यश विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धा करिता निश्चितच प्रेरणा देणारे आहे. यावेळी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.या बालनाट्यासाठी संस्कृतिक विभागाचे सहाय्यक व्यवस्थापक आत्मदर्शन बागडे यांनी विशेष मेहनत घेतली तर स्वच्छ परिसर व स्वच्छ किचन यासाठी सुनील खरात व नितीन शिंदे यांनी परिश्रम घेतले. या विद्यार्थ्यांना वसंत नारद, गणेश महाराज जाधव, ओमकार गंभीरे, आकाश खंडागळे यांचे मार्गदर्शन लाभले.या यशस्वी विद्यार्थ्यांचे प.पू. आत्मा मालिक माऊलींच्या कृपाआशीर्वादासह संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, बाळासाहेब गोर्डे उपाध्यक्ष, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतीगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, वसतिगृह व्यवस्थापिका मीरा पटेल, प्राचार्य निरंजन डांगे, प्राचार्य माणिक जाधव सर्व विभाग प्रमुख यांनी अभिनंदन केले.

## राष्ट्रीय सेवा योजना संस्काराची कार्यशाळा : प्रा.गणेश निमसे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या जडणघडणीत युवकांचे मोलाचे स्थान आहे. देशाच्या विकासात युवकांचा सहभाग मोलाचा असून देशाच्या विकासाला गती देण्याची क्षमता युवकांमध्ये असते. असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. गणेश निमसे यांनी केले. ते कोपरगाव येथील सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

सदर प्रसंगी त्यांनी आपल्या मनोगतात,समाज जडणघडणीत युवकांचा म ोलाचा वाटा असतो. राष्ट्राच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती देण्याचे काम युवक करत असतात. युवावस्था आणि वृद्धावस्था हे समाजाचे घटक असतात, परंतु समाजाला योग्य दिशा देण्याचे काम युवक करत असतात. युवकांनी अष्टौप्रहर काम करावे आणि नाविन्यपूर्ण गोष्टी कराव्या व त्या शिकण्यास आग्रह धरावा, युवकांनी स्वतःला आधुनिक युगात अद्ययावत ठेवावे,

तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवल्याने बौद्धिक व सामाजिक विकास होतो. यासाठी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय



सेवा योजना हा उत्तम पर्याय आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः च्या आणि पर्यायाने देशाच्या विकासासाठी वेळेचे नियोजन करावे, प्रसार माध्यमाचा योग्य वापर करावा व अतिरेकी समाजमाध्यमांच्या आहारी न जाता वाचन करावे. विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहावे, राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट 'माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी' हे आहे. या ब्रीदवाक्याचा विद्यार्थ्यांनी जीवनात अंगीकार करावा, सामाजिक ऋणातून उतराई होण्यासाठी झोकून द्यावे. उल्लेखनीय सामाजिक कार्यासाठी स्वयंसेवकांना मोठा वाव आहे. पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी प्रत्येक युवकाची आहे, ती त्याने पार पाडली पाहिजे. नेतृत्वगुणांच्या विकासाला चालना देण्यासाठी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी व्हावे. असे प्रतिपादन त्यांनी केले. प्रमुख उपस्थिती लाभलेले डॉ. गायकवाड बी.एस यांनी, राष्ट्र सेवा योजनेचे औपचारिकरित्या उद्घाटन करताना विद्यार्थ्यांनी राष्ट्र सेवा योजनेत आपले नेतृत्व गुण सिद्ध करावे. असे आवाहन केले.अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा, नेतृत्वगुण यांचा विकास करणारी संस्था आहे.

विद्यार्थ्यांनी समाजात वावरताना आपली ध्येय निश्चित करावी, ध्येय प्राप्तीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेतील विविध उपक्रम ांमध्ये सहभाग घ्यावा, त्यामुळे व्यक्तिमत्व विकास मोठ्या प्रमाणात होतो. असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. बंडेराव तऱ्हाळ यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी विज्ञान शाखा उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत, डॉ. सुभाष सैंदनशिव, डॉ. योगेश दाणे, डॉ. बाळू वाघमोडे, डॉ. प्रमोद चव्हाण यांसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.सदर कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी पाटोळे यांनी केले तर, आभार प्रा.महेश दिघे यांनी मानले.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली,कोल्हापूर,सातारा,सोलापूर,पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस, छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळविण्यासाठी संपर्क : 9021651976